# श्री रामचंद्र मिशन
# एकोज इंडिया

जानेवारी 2009 | केवळ खाजगी वितरणाकरिता | खंड 2 अंक 1


प्रिय बंधु भगिनींनो,
आपणांसर्वांस नववर्षाच्या हार्दिक शुभेच्छा व एकोज इंडिया वार्तापत्राच्या सन 2009 च्या प्रथम अंकात आपले हार्दिक स्वागत.

या नवीन वर्षाची सुरुवातच, सन 2009 व त्या पुढील काळासाठी कुठले संकल्प करण्याची गरज आहे, याबाबतच्या पू. गुरुदेवांच्या अमुल्य मार्गदर्शनाने झाली. पू. गुरुदेवांचे हे भाषण आम्ही येथे अंशरुपाने देत आहोत. पू. गुरुदेवांनी त्यांच्या प्रवासात तिरुपुर, मलमपूझ्झा, त्रिसुर, कलकत्ता व खरगपुर या काही प्रमुख ठिकाणांना भेटी दिल्या.

पू. गुरुदेवांनी सर्व अभ्यासींना प्रेम, क्षमा, संयम व समजुतदारपणा यासारख्या नैतिक मुल्यांचा विकास करण्याचा संदेश दिला व त्यास प्रतिसाद म्हणुन देशातील अनेक केंद्रांनी यासंबंधी चर्चा करण्यासाठी व अभ्यासींच्या मनावर ही मुल्ये ठसविण्यासाठी अनेक कार्यक्रमांचे आयोजन केले होते.

या अंकामध्ये अभ्यासी प्रशिक्षण कार्यक्रम, अभ्यासी मेळावे व नवीन प्रकाशनांचा समावेश करण्यात आला आहे. श्री रामचंद्र मिशनचा प्रथम आश्रम असणा–या "तिरुपती आश्रमाचा" देखिल 'प्रकाशाची केंद्रे' या विभागात विशेष उल्लेख करण्यात आला आहे.

मार्च 2009 च्या अंकासाठी बातम्या स्विकारण्याची अंतिम तारीख 15 फेब्रुवारी 2009 आहे. आपल्या विभागातील कार्यक्रमाचे वृत्तांत छायाचित्रांसहीत आपल्या संबंधित विभाग प्रमुखांमार्फत पाठवावे.

संपादकीय मंडळ.

2009

## पू. गुरुदेवांचा नववर्ष संदेश

(दि. 31 डिसेंबर 2008 रोजी दिलेल्या संदेशातील काही अंश)

सहजमार्ग अभ्यासी म्हणून आपणांस या वास्तवाची जाणीव असली पाहिजे की आपल्या मानवी जीवनाचे एकच उद्दीष्ट असले पाहिजे आणि ते म्हणजे, एक मोक्ष, दुसरे आत्मसाक्षात्कार आणि तिसरे व शेवटचे म्हणजे दिव्यत्वासमवेत संपूर्ण एकरुपता.

आजच्या जगामध्ये पू. बाबूजी महाराजांनी सांगितल्याप्रमाणे सहजमार्ग हा सर्वात सोपा व मोक्षाकडे लवकरात लवकर घेऊन जाणारा मार्ग आहे. पण त्याचबरोबर त्यांनी ह्या गोष्टीवर देखील भर दिला आहे की या जीवनात जर आपण आपले मन निश्चयपूर्वक या एकाच साध्याच्या मागे लावले तर मोक्षानंतर येणारे आत्मसाक्षात्कार व दिव्यत्वासमवेत एकरुपता ही साध्ये देखिल कठिण नाहीत. व हेच मानवीय विकासाचे उद्दीष्ट व मानवी जीवनाचे ऊद्देश्य आहे.

आपण आपल्या मनातुन धर्म, संस्कृती, शिक्षण, समाज या गोष्टींवर आधारलेले सर्व भेदाभेद नष्ट करणे व विसरुन जाणे आवश्यक आहे. आणि हे लक्षात ठेवले पाहिजे की मानवी जीवनात आपणांस एकत्र आणणारा





आपल्या आतील आत्मा आहे. तो सर्वांमध्ये सारखाच असतो. संस्कारांमुळे आपला देह चुका करत असतो. आपली जुनाट मते व पूर्वग्रह यामुळे आपले मन चुका करते. परंतु आत्मा कधीही चुक करत नाही.

आणि म्हणूनच मी तुम्हाला पुढील संकल्प करण्याची विनंती करतो. – " हे गुरुदेव, मला स्वत:ला क्षमा करण्यासाठी मदत करा. तसेच माझ्याद्वारे अशा ईतर सर्वांना क्षमा करा ज्यांनी माझ्यासाठी वा माझ्या विरोधात, इतरांसाठी वा त्यांच्या विरोधात काही केले आहे असे मला वाटते. मी हे जाणतो की शेवटी यामागे दिव्य गुरुदेवच आहेत जे या पृथ्वीवरील मानवीय अस्तित्वरुपी नाटकाचे दिग्दर्शन करित आहेत."

## बंगलोर



दि. 31 ऑक्टोबर रोजी पू. गुरुदेवांचे दुबईहून आगमन झाले. अभ्यासींच्या छोट्या समुहाने त्यांचे स्वागत केले व त्यानंतर ते आपल्या 'शुभ एन्क्लेव्ह' या निवासस्थानी रवाना झाले.

रविवार 2 नोव्हेंबर रोजी, पू. गुरुदेवांनी बंगलोर मधील तिस–या आश्रमाचे उद्घाटन केले व त्यासं नाव दिले "परमधाम".

हा आश्रम म्हणजे लाल विटांनी बांधलेली एक सुंदर व सुबक इमारत आहे ज्यामध्ये तळमजल्यावर ध्यानगृह, स्वयंपाकघर, वाचनालय आणि कार्यालय आहे. तर इतर 2 मजल्यांवर रहाण्यासाठी 32 खोल्या, 2 गेस्टरुम व 2 डॉर्मेट्रिज आहे.

ध्यानानंतर परमधाम विषयी बोलताना पू. गुरुदेव म्हणाले "परमधाम म्हणजे असे स्थान जेथून कधीही परत येथे यावे लागत नाही." 12 तारखेला सकाळी पू. गुरुदेव चेन्नईसाठी रवाना झाले. वाटेत काही काळ ते नतरामपल्ली आश्रमामध्ये थांबले होते.

## तिरुपूर

दि. 3 डिसेंबर रोजी पू. गुरुदेवांचे "डायमन्ड ज्युबिली पार्क, तिरुपूर" येथे आगमन झाले. पू. गुरुदेव अतिशय आनंदी व उत्साही होते. आल्यानंतर काही काळ ते अभ्यासींसोबत बसले व त्यांच्याशी गप्पा मारल्या. पू. गुरुदेव या संपूर्ण वास्तव्यादरम्यान अतिशय चांगल्या मूड मध्ये होते. ते येथे एक आठवड्यापेक्षा जास्त काळ रहाणार असल्याने त्यांना भेटायला येणा–या अभ्यासींचा ओघ सतत चालूच होता.

दि. 5 डिसेंबर रोजी स. 6.30 वा. पू. गुरुदेवांनी सुमारे 2000 वर्गफूट क्षेत्रफळावर उभारलेल्या नवीन स्वयंपाकघराचे उद्घाटन केले. हे स्वयंपाकगृह मणपक्कम येथील स्वयंपाकगृहाप्रमाणेच तयार केले आहे. यावेळी पू. गुरुदेव म्हणाले "अवचित येणा–यास अतिथी म्हणतात. त्यांचे आदरपूर्वक स्वागत केले पाहिजे. अन्नदान हे असे एकमात्र दान आहे ज्यामुळे घेणा–याला तृप्त झाल्यासारखे वाटते. जे कोणी अन्न वाढण्याचे काम करतात, त्यांनी अन्न स्विकारणा–याचा पूर्ण आदर ठेऊन ते केले पाहिजे. नुसते टेबलावर अन्न मांडून त्यांना जेवायला बोलविण्यापेक्षा त्यांना योग्य प्रकारे आमंत्रण दिले पाहिजे व त्यांची वैयक्तिक काळजी घेतली पाहिजे.



रविवारी ध्यान संपल्यानंतर, पू. गुरुदेवांनी ध्यानादरम्यान वाजणा–या भ्रमणध्वनी (मोबाईल फोन) बाबत एक कठोर ऊद्घोषणा केली. ते म्हणाले " जर अभ्यासींमध्ये एवढीही गंभीरता नसेल तर आश्रमात येण्याचे प्रयोजनच काय? जे कोणी आपल्या फोनवर बोलु ईच्छितात त्यांनी येथे येण्यापेक्षा घरी खुशाल फोनवर बोलत बसावे."

दि. 10 डिसेंबर रोजी पू. गुरुदेवांनी उडूमलपेट या गावास भेट दिली. येथील अभ्यासींनी या गावानजीकच 5 एकर जमीन मिशनला दान केली आहे. या सर्व अभ्यासींनी पू. गुरुदेवांचे अतिशय उत्साहात स्वागत केले. उपस्थित अभ्यासींबरोबर गप्पा मारत पू. गुरुदेवांनी काही काळ व्यतीत केला.



## मलमपूझ्झा

पू. गुरुदेवांनी दि. 17 ते 20 डिसेंबर या काळात केरळ मधील मलमपूझ्झा येथील एस. एम. एस. एफ. रिट्रिट सेंटरला भेट दिली. या केंद्रास पू. गुरुदेवांची ही चौथी भेट होती व ते प्रथमच येथे निवास करणार होते. याच दरम्यान येथे "स्कॉलरशिप प्रशिक्षण कार्यक्रम" सुरु असल्याने सुमारे 40 स्कॉलर्स आणि समन्वयकांचा समूह येथे आधीपासुनच उपस्थित होता.

पू. गुरुदेवांनी ध्यानगृह व त्यांच्या कक्षाचे उद्घाटन केले. ते अत्यंत उत्साही व निश्चिंत होते. यावेळी त्यांनी बराच वेळ स्कॉलर्स आणि भेटायला येणा–या अभ्यासींशी बोलण्यात घालवला.

पू. गुरुदेव नवीन वाचनालयात प्रशिक्षणार्थींना संबोधीत करताना म्हणाले "अध्यात्मिक जीवनामध्ये जर का तुम्ही जग बदलण्याच्या हेतूने येत असाल तर तुम्हाला काहीही साध्य होणार नाही परंतु मी तुम्हास निश्चीतपणे सांगु शकतो की जर तुम्ही स्वत:ला बदलण्यासाठी येत असाल तर यशाची खात्री नक्कीच आहे, पण त्यासाठी तुम्ही स्वत:ला बदलण्यासाठी स्वत:चाच वापर केला पाहिजे.



## त्रिसुर

19 डिसेंबर 2008 ला पू. गुरुदेवांनी केरळ मधील त्रिसुर येथे पुझक्कलमध्ये ध्यानगृहाचे ऊद्घाटन केले. हा आश्रम त्रिसुर पासून 5 कि.मी. अंतरावर त्रिसुर – कुन्नामकूलम रस्त्यावर आहे. येथे पू. गुरुदेवांनी सत्संगाचे संचालन केले व त्यानंतर छोटे भाषण दिले. या भाषणात त्यांनी हृदयाचा सल्ला ऐकण्याचा उपदेश दिला जेणेकरुन हृद्यातील शाश्वत अस्तित्व हे खरेखुरे शाश्वत अस्तित्व बनू शकेल. व हे अस्तित्व आपल्या उद्धारासाठी एक प्रामाणिक मार्गदर्शक ठरेल." 40 परदेशी अभ्यासींसह सुमारे 1000 अभ्यासींनी या समारोहात भाग घेतला. सत्संगानंतर गुरुदेवांनी त्यांच्यासाठी खास तयार केलेल्या कक्षामध्ये काही अभ्यासींची भेट घेतली व जेवण केल्यानंतर मलमपूझ्झाकडे प्रयाण केले.




## कोलकाता

दि. 25 डिसेंबर 2008 रोजी पू. गुरुदेवांचे चेन्नईहून कोलकाता येथे आगमन झाले. त्यांच्या बरोबर प्रवासात सुमारे 35 अभ्यासी देखिल होते. 26 तारखेला दुपारी पू. गुरुदेव त्यांच्या कक्षाबाहेर असलेल्या हिरवळीवर येऊन बसले व येथील आल्हाददायक वातावरणाचा अनुभव घेत असतां ते म्हणाले " आपला प्रत्येक आश्रम हा शांतीचे एक मरुस्थळच आहे." "आपण बाहेर असे जग का निर्माण करु शकत नाही?" या प्रश्नाला ऊत्तर देताना ते म्हणाले "आपली संपत्तीची हाव आपल्याला आनंद, समाधान व कधीकाळी अनुभवलेल्या चांगल्या आरोग्यापासुन दूर करते."

दि. 29 ला गुरुदेवांनी द्वितीय क्रेस्ट केंद्राची खरगपुर येथे पायाभरणी केली. येथे 5 एकराच्या परिसरात फिरतांना पू. गुरुदेव त्यांच्या मागोमाग फिरणा–या अभ्यासींना विनोदाने म्हणाले "माझे अनुसरण ईतर प्रकारे करण्यापेक्षा अध्यात्मिक मार्गावर करा."

सत्संगानंतर जबाबदारी विषयी बोलताना पू. गुरुदेव म्हणाले "या पृथ्वीतलावरील ईतर कुठल्याही जबाबदारीपेक्षा आपली आपल्या स्व प्रती (हृदयाप्रती) असणारी जबाबदारी खूप मोठी आहे." जेवणानंतर पू. गुरुदेव कोलकाता येथे रवाना झाले व तेथून दुस–या दिवशी दुपारी सुमारे 40 अभ्यासींसह त्यांनी चेन्नईला प्रयाण केले.






# श्री रामचंद्र मिशन
# एकोज इंडिया

झोनल एकत्रीकरण

जानेवारी 2009 | केवळ खाजगी वितरणाकरिता | खंड 2 अंक 1


## सतखोलसाठीचे अर्ज – वर्ष 2009.

वर्ष 2009 करिता आवेदनाचे अर्ज आता खालील संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. http://www.srcm.info/satkhol/satkhol_home.htm

वसंत ऋतुतील तुकड्या – जानेवारी ते मार्च (तुकडी नं. 249 ते 259) इंटरनेटद्वारे अर्ज स्विकारणे सुरु आहे.


ऊन्हाळी तुकड्या – एप्रिल ते जून (तुकडी नं. 260 ते 271) दि. 10 जाने. 2009 पासुन अर्ज स्विकारले जातील.

हिवाळी तुकड्या – सप्टेंबर ते डिसेंबर ( तुकडी नं. 272 ते 281) दि. 10 जुन. 2009 पासुन अर्ज स्विकारले जातील.


प्रवेश अर्ज भरण्यापूर्वी मार्गदर्शक तत्वे व नियम कृपया काळजीपूर्वक वाचून घेणे. ज्या अभ्यासींना इंटरनेट सेवेचा वापर करणे शक्य नसेल, त्यांनी आपल्या संबंधीत प्रशिक्षक, केंद्र प्रमुख अथवा विभागीय प्रमुखांशी मदतीसाठी संपर्क साधावा. आपल्या कुठल्याही शंकानिरसनासाठी आपण सतखोल प्रशासकीय कार्यालयात खालील क्रमांकावर सकाळी 10 ते 12 व दुपारी 3 ते 4.30 या वेळेत संपर्क साधावा.

दुरध्वनी क्रमांक – 044 2252 1099 / 4217 1111 विस्तारित क्रमांक 218.


## नवीन प्रकाशने





1 जाने. 2009 रोजी पू. गुरुदेवांच्या हस्ते "सहजमार्गाची तत्वे भाग 14" या पुस्तकाचे अनावरण करण्यात आले. या पुस्तकामध्ये पू. गुरुदेवांनी 1991 च्या पूर्वार्धात दिलेल्या 25 भाषणांचा समावेश आहे. या 320 पानी पुस्तकामध्ये अनेक विषयांवरील भाषणे सम्मिलित केली आहेत ज्यामध्ये लक्ष्य, कार्याद्वारे सेवा, वेदनेच्या पलीकडे, नेतृत्व आणि गुरुदेव आदी विषय समाविष्ट केले आहेत.




"द फ्रूट ऑफ द ट्रि" (झाडाचे फळ) हे पुस्तक सर्वप्रथम 1987 मध्ये प्रकाशित झाले होते. याचीच दुसरी आवृत्ती दि. 1 जानेवारी 2009 रोजी प्रकाशित करण्यात आली. या पुस्तकामध्ये पू. गुरुदेवांची भाषणे व प्रश्नोत्तरे यांचा प्रामुख्याने अंतर्भाव करण्यात आला आहे. ही भाषणे सप्टेंबर – ऑक्टोंबर 1986 मध्ये पू. गुरुदेव इटली, अमेरीका व जर्मनीच्या दौ–यावर असतानाची आहेत.




हृदयीचे बोल 2006 – हार्टस्पीक 2006 या मूळ इंग्रजी पुस्तकाच्या या मराठी आवृत्तीमध्ये पू. गुरुदेवांनी भारतात व भारताबाहेर जानेवारी ते डिसेंबर 2006 या काळादरम्यान निरनिराळ्या ठिकाणी दिलेल्या भाषणांचा संपूर्ण संग्रह आहे. यामध्ये पू. गुरुदेवांनी तिरुपूर, बंगळूर, चेन्नई, अहमदाबाद, कानपूर, हैद्राबाद, पूणे, रायपूर, रोम, डेन्मार्क, जर्मनी, प्राग, दुबई, सिंगापूर आणि मलेशिया या ठिकाणी दिलेल्या सर्व संदेशांचा समावेश आहे.




जानेवारी 2009 चा "कॉन्स्टंट रिमेंबरन्स" चा अंक लवकरच वितरीत करण्यात येईल. एप्रिल 2009 च्या अंकाचा विषय "कृतज्ञता" (ग्रॅटिट्यूड) आहे. या विषयावरील आपले लेख व आपल्याला साधनेदरम्यान आलेले अनुभवांचे स्वागत आहे. हे लिखाण 1 फेब्रुवारी 2009 पर्यंत आमच्याकडे पोहोचेल असे पाठवावे. (cr@srcm.org)

## मणपक्कम आश्रमातील पूर

26 नोव्हेंबरचा दिवस बंगालच्या उपसागरात वादळीवारे सुरू झाल्यामुळे पाउस घेऊन आला, आणी सायंकाळपर्यंत अक्षरश: ओतल्यागत पावसाची संततधार सुरू झाली. सुरक्षिततेचा उपाय म्हणून आश्रमातील सर्व रहिवाशांना आश्रमात सुरक्षित स्थळी हलविण्यात आले तसेच अनेक वस्तु उंच ठिकाणी नेऊन ठेवण्यात आल्या.

27 नोव्हेंबरच्या संध्याकाळ पर्यंत आश्रमातील रहिवाशांचे स्थलांतर करून त्यांना राहण्यास आश्रमासमोर असलेल्या 'गार्डन ऑफ हार्ट्स' या इमारतीत ईतर अभ्यासींबरोबर जागा उपलब्ध करून देण्यात आली. मध्यरात्रीच्या सुमारास पाणी 'सहज' नदीवर असलेल्या (कॉटेज परिसरामधील) पुलावरुन वाहू लागले आणि पाण्याची पातळी धोकादायक स्थितीत आली. साधारणपणे रात्री दीडच्या सुमारास 'लायन गेट' भिंत कोसळली आणि काही मिनिटातच कॉटेजमध्ये सुमारे दिडफुट पाणी भरले. आश्रमसुद्धा जुन्या वैद्यकीय केंद्राच्या बाजुकडून जवळ जवळ 12 फुट पाण्याखाली गेला.

पाऊस 28 नोव्हेंबरच्या सकाळपर्यंत थांबण्याची काही चिन्हे दिसेनात आणि त्यातच भर म्हणून जवळ असणा–या तलावातून व अड्यार नदीतुन येणारे पाणी समस्या वाढवित होते. दुपारपर्यंत काही तराफे (रोयपूरम स्थित कोळ्यांसह) व रबरी नौका (तटरक्षक दल) आश्रमात पोहोचल्या. घरामध्ये अडकलेल्या सुमारे 50 जणांची तटरक्षक दल व कोळी बांधव यांनी सुखरुप सुटका करण्यात यश मिळवले.

29 नोव्हेंबर पर्यंत ध्यानकक्षाच्या आजुबाजुला असलेल्या परिसरातुन बरेच पाणी ओसरले होते. पू. गुरुदेवसुद्धा या दिवशी पहाणी करण्यास आले होते. गायत्रीवर जाण्याअगोदर त्यांनी आश्रमात फेरफटका मारुन ब–याच ठिकाणांची पहाणी केली. 3 तारखेला पू. गुरुदेवांनी आश्रमातुनच तिरुपूरसाठी प्रयाण केले.

त्यानंतर भारताच्या अनेक भागातून, पुरामुळे आलेला कचरा साफ करण्यासाठी, स्वयंसेवकांची आश्रमाकडे रीघ लागली होती. डॉर्मेट्रिज, स्वयंपाकघर, स्वच्छतागृहे आणि इतर सर्व परिसर स्वयंसेवकांनी संपूर्णत: स्वच्छ केला. या संपूर्ण काळामध्ये आश्रमात अभ्यासींसाठी प्रवेश बंद ठेवण्यात आला होता.

दि. 31 रोजी सर्व अभ्यासींच्या उपस्थितीत स्वयंपाकघर व उपहारगृह हे पू. गुरुदेवांनी अभ्यासींसाठी पुन्हा खुले केले. संध्याकाळी ध्यानकक्षामध्ये संगीताचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. पू. गुरुदेवांनी मध्यरात्री अचानक सत्संगाचे आयोजन करुन सर्व अभ्यासींना आश्चर्याचा सुखद धक्का दिला. 1 डिसेंबरला सकाळी 9 वा. देखील पू. गुरुदेव सत्संगाचे संचालन केले व एक छोटेसे भाषण दिले. पूर्वनिर्धारित वेळापत्रकाप्रमाणे आश्रम पूर्ववत होऊन सगळ्या अभ्यासींसाठी खुला झाला. हे सर्व सांघीक कार्यामुळेच शक्य झाले त्याबद्दल आम्ही सर्वांचे आभारी आहोत.

गुरुदेवांचे कॉटेज



भोजनालयाचा परिसर



श्री रामचंद्र मिशन
एकोज इंडिया
झोनल एकत्रीकरण
जानेवारी 2009 केवळ खाजगी वितरणाकरिता खंड 2 अंक 1

## प्रगत प्रशिक्षण कार्यक्रम – जयपूर

दि. 30 नोव्हेंबर 2008 रोजी, झोनल आश्रम जयपूर येथे एकदिवसीय प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. एक वर्षाहून अधिक काळ सहजमार्ग साधना करणारे 10 वेगवेगळ्या केंन्द्रांवरील सुमारे 85 अभ्यासी या कार्यक्रमास उपस्थित होते. सतत स्मरण, मिशनचे साहित्य वाचण्याचे महत्व, योग्य दृष्टिकोन आणि वागणूकीचे आपल्या आध्यात्मिक प्रगतीसाठी महत्व, रुपांतरण, स्वयंसेवकाची भूमिका आणि दैनिक साधनेत टाळावयाच्या सामान्य चुका – यासारख्या विषयांवर या कार्यक्रमामध्ये विविध सत्रांचे आयोजन करण्यात आले होते. अजमेर केंद्राच्या अभ्यासींनी सहजमार्गाची नवीन अभ्यासींना कश्याप्रकारे ओळख करुन द्यावी यावर एक छोटीशी नाटिका सादर केली.

## नवीन साधकांचा मेळावा – वडोदरा



वडोदरा आश्रमाच्या परिसरात नवीन अभ्यासींसाठी रविवार दि. 19 ऑक्टोंबर 2008 रोजी एका कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या अर्ध दिवसीय कार्यक्रमाचे ऊद्दिष्ट सहजमार्ग साधनेच्या मूळ तत्वांवर प्रकाश टाकणे हे होते. यामधील विविध सत्रांनी या कार्यक्रमास अधिकच ऊत्कंठावर्धक बनविले होते ज्यामुळे सहभागी अभ्यासींमध्ये बंधूभाव जागृत होण्यास मदत झाली. कार्यक्रमास अधिक रंगतदार बनविण्यासाठी चर्चासत्रं, उदाहरणे, क्रियात्मकता व प्रतीक्रिया आदी साधनांचा वापर करण्यात आला.

## साधना कार्यक्रम – शहाजहॉंपूर



दि. 12 ते 16 नोव्हेंबर रोजी शहाजहॉंपूर आश्रमामध्ये हिन्दीतील प्रथम साधना कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे उद्घाटन येथील केंद्र प्रमुख बंधू सर्वेशचंद्र यांनी केले. त्यांच्या भाषणामध्ये त्यांनी शहाजहॉंपूर आश्रमाचे महत्व अधोरेखित केले व प्रत्येकास पू. गुरुदेव व पू. बाबुजी महाराज आपणांस जे बनवू ईच्छीत आहेत ते बनण्याचा सल्ला दिला. अभ्यासींनी यापासुन प्रेरणा घेऊन आपल्या जिवनातील 5 सकारात्मक व 5 नकारात्मक घटक हे स्व परिक्षण, ऊणिवांचा स्विकार व त्या दूर करण्यासाठी स्वत:मध्ये बदल करण्याची तयारी करण्यासाठी लिहून काढले.

या विषयांची तयारी 6 वेगवेगळ्या गटांद्वारे करण्यात आली. प्रत्येक गटातील अभ्यासींनी आपापल्या विषयासंबंधीचे सादरीकरण केले. प्रशिक्षक वर्गाद्वारे याचा समारोप करण्यात आला व विचारलेल्या प्रश्नांना ऊत्तरे देण्यात आलीत.

## अभ्यासी प्रशिक्षण कार्यक्रम – पैठण

9 नोव्हेंबर 2008 रोजी पैठण येथे अभ्यासी प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या केंद्राद्वारे आयोजित करण्यात आलेला हा पहिलाच कार्यक्रम होता. यासाठी पैठण, अहमदनगर व आसपासच्या केंद्रांमधून 143 अभ्यासी उपस्थित होते. या कार्यक्रमामध्ये सहजमार्गाची ओळख, ध्यान, सहजमार्गाची गुरु परंपरा, सफाई व तिचे महत्व इत्यादी विषयांचा समावेश करण्यात आला होता. सर्व वक्त्यांनी अतिशय परिणामकारकरित्या या विषयांचे सादरीकरण केले ज्यामुळे सर्व अभ्यासींना विषय समजण्यात अतिशय मदत झाली. या कार्यक्रमाचे संचालन मुंबई केंद्राचे बंधू तुषार प्रधान यांनी केले. यावेळी श्रोत्यांचा प्रतिसाद अतिशय चांगला होता व त्यांनी हा कार्यक्रम खूपच उपयोगी ठरल्याची भावना व्यक्त केली.

## युवा मेळावा – अहमदाबाद




पू. गुरुदेवांनी चेन्नई येथे नुकत्याच दिलेल्या भाषणामध्ये सर्व अभ्यासी बांधवांना चरित्र निर्माण करण्यावर लक्ष केंद्रित करण्याचा संदेश दिला होता. याच अनुषंगाने 14 डिसेंबर रोजी अहमदाबाद येथे झालेल्या युवा मेळाव्यामध्ये "वैयक्तिक चरित्र हाच अध्यात्मिक जिवनाचा पाया" या संकल्पनेवर भर देण्यात आला होता. हे एक असे व्यासपीठ होते जेथे आत्मपरिक्षण करणे, स्वत:चे मुल्यांकन करुन स्वत:चे जीवन जे आपणंच गुंतागुंतीचे करुन ठेवले आहे त्यावर उपाय शोधण्याचा प्रयत्न करण्यात आला.

यामधून झालेला मोठा लाभ म्हणजे मिशनच्या कार्यामध्ये सहभागी होण्याच्या गरजेवर भर देतानाच ब–याच युवकांनी नियमीतपणे स्वयंसेवक म्हणून काम करण्याची तयारी दाखविली. आता सर्वात महत्वाचे ठरणार आहे ते म्हणजे 2009 मध्ये या तरुणांची उर्जा व ऊत्साह असाच टिकवून ठेवणे.

## अभ्यासी प्रशिक्षण कार्यक्रम – खानापूर – जिल्हा बेळगाव

बिदरचे बंधु राजु काशमपूरकर यांच्यासह बेळगावचे सुमारे 15 अभ्यासी खानापूरच्या नवीन अभ्यासींसोबत एकत्र आले होते. या प्रसंगी मुख्याध्यापक असलेल्या एका अभ्यासीने आपल्या शाळेचा परिसर कार्यक्रमासाठी उपलब्ध करुन दिला होता.

कार्यक्रम अतिशय उत्तम प्रकारे पार पडला व उपस्थित अभ्यासींनी दुर्मिळ अश्या परिपक्वतेचे प्रदर्शन करतांना मिशनची मुल्ये तर स्विकारलीच पण त्याचबरोबर सहजमार्ग उत्तम प्रकारे आत्मसात केल्याचे देखील दाखवून दिले. कार्यक्रमाची सुरुवात ध्यानानंतर बंधु वस्त्राड यांनी "मास्टर्स चॉईस" मधील सुमधुर संगीताने केली. त्यानंतरचा कार्यक्रम हा पारंपारिक अभ्यासी प्रशिक्षणाच्या अंगाने सुरु झाला. ज्यामध्ये उपलब्ध मल्टिमिडिया साधनांचा वापर करुन कार्यक्रमाला एक रेखिव व शिस्तबद्ध स्वरुप देण्यात आले. विविध वक्त्यांनी सहजमार्ग साधना पद्धतीवर भाषणे दिलीत. कार्यक्रमाचा समारोप सायंकालीन ध्यानाने झाला. अभ्यासींनी या कार्यक्रमाविषयी आनंद व्यक्त केला व त्यापैकी काही जणांनी लवकरच पू. गुरुदेवांना प्रत्यक्ष भेटण्याची इच्छा प्रदर्शित केली.

## शिक्षकांसाठी मुल्याधारित अध्यात्मिक प्रशिक्षण – अहमदनगर



7 नोव्हेंबर 2008 रोजी अहमदनगर महाराष्ट्र येथे नियमितपणे रविवार सत्संग होणा–या प्राथमिक शाळेत मुल्याधारित अध्यात्मिक प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी बोलताना बंधु विश्वास टिल्लु यांनी आजच्या समाजामध्ये मुल्यांच्या महत्तेवर जास्त भर दिला तर बंधु तुषार प्रधान यांनी मुल्याधारित शिक्षणासंबंधी विविध शाळांनी अंगीकारलेला दृष्टिकोन व 'स्मृती'द्वारे (एस.एम.आर.टी.आय.) स्विकारलेला दृष्टिकोन यावर विवेचन केले.

मोठ्या शहरांच्या तुलनेत लहान गावांमध्ये नैतिक मुल्ये जास्त कसोशिने पाळली जातात असे समजले जाते परंतु या कार्यक्रमासाठी आलेल्या गटास असा अनुभव आला की आजकालच्या टि.व्ही. आणि विविध मिडियाच्या जगामध्ये छोट्या गावांमध्ये ही मुल्ये टिकवून ठेवणे जास्ती आवश्यक आहे.

भाषणांमधून एक गोष्ट प्रामुख्याने पूढे आली की आज स्पर्धेच्या व गळाकापू चढाओढीच्या जगात लहान मुलांना त्यांच्या पालक, शिक्षक व इतर वर्गाकडून ढकलले जात आहे. त्यामुळे मानवी मुल्यांची जपणूक करणे व रोजच्या जगातील तणावाला सामोरे जाताना संतुलन राखणे हे महत्वाचे ठरले आहे. एक म्हण आहे की "मुल्ये जर शिकविली तर ती अभावानेच स्विकारली जातात". मुलांच्या व्यक्तिमत्व विकासामध्ये शिक्षक खूपचं महत्वाची भूमिका निभावू शकतात तसेच विद्यार्थ्यांचा त्यांच्यावर असलेला विश्वास आणखीनच वृद्धिंगत करण्याची खूप मोठी जबाबदारी त्यांच्यावर आहे.

यावेळी काही प्रयोग, क्रिया व गोष्टींच्या माध्यमातुन मुल्यसंवर्धन कसे करता येते याचे प्रात्यक्षिक करुन दाखविण्यात आले. 'योग्य वयामध्ये योग्य मुल्ये' या स्मृतीच्या धोरणाबाबतही माहिती देण्यात आली. या सर्व भाषणानंतर प्रश्नोत्तरांचे सत्र पार पडले.

शाळेचे विश्वस्त आणि मुख्याध्यापक यांनी स्मृतीच्या गटाचे या सुंदर कार्यक्रमासाठी मन:पूर्वक आभार मानले ज्याची झलक एक शिक्षकाने केलेल्या समारोप भाषणाद्वारे सर्वांनाच दिसुन आली.

### अतिशय महत्वाचे

सर्व अभ्यासींना, पू. गुरुदेवांच्या औपचारिक अथवा व्यक्तिगत संभाषण अथवा भाषणांचे, लिखीत परवानगी शिवाय ऑडियो किंवा व्हिडीयो रेकॉर्डिंग करण्यास सक्त मनाई आहे. तसेच पूर्व परवानगी शिवाय कुठलेही भाषण अथवा संभाषण कुठल्याही वेबसाईटवर प्रकाशित करण्यास देखिल सक्त मनाई आहे.



## शिक्षक व विद्यार्थ्यांसाठी आयोजित मुल्याधारित अध्यात्मिक शिक्षण – राणीगंज

14 व 15 नोव्हेंबर रोजी द्न्यानभारती शाळेच्या विनंतीवरुन तेथील विद्यार्थी व शिक्षकांसाठी राणीगंज केंद्रातर्फे एका कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाचे संयोजन बंधु अनील, पंकज रजक, विजय चौधरी, सुशांत व शेखर या अभ्यासी बंधुंनी केले.

इ. 9 ते 12 वी च्या 400 विद्यार्थ्यांनी या संवादात्मक कार्यक्रमाचा लाभ घेतला व आपला प्रतिसाद दिला. या शाळेचे मुख्याध्यापक व समन्वयक संपूर्ण वेळ या कार्यक्रमास उपस्थित होते. सुमारे 300 विद्यार्थ्यांनी या कार्यक्रमासंबंधी आपल्या प्रतिक्रिया दिल्या ज्या पुढे मुख्याध्यापकांकडे पाठविण्यात आल्या. या प्रतिक्रियांमध्ये मुख्यत: शालेय विकासाकरता या प्रकारच्या कार्यक्रमाची गरज अधोरेखित करण्यात आली होती. मुल्याधारित शिक्षणासंबंधी स्मृतीच्या दृष्टिकोनाचे विवेचंन अनेक प्रयोगांद्वारे व पॉवरपॉइंटच्या सादरीकरणाद्वारे करण्यात आले.

दुस–या दिवसाचे सत्र स्मृतीच्या प्रथेप्रमाणे शिक्षकांकरिता होते ज्यामध्ये प्रयोग व पॉवरपॉइंटच्या सादरीकरणाचा वापर करण्यात आला. सर्व उपस्थितांना हे खूपच उपयोगी वाटले व अनेकांनी तर असे मत व्यक्त केले की ते यापूढे चागला माणूस बनण्याचा प्रयत्न करतील ज्यायोगे ते एक चांगले शिक्षक देखील बनु शकतील.

## पालकांसाठी मुल्याधारित शिक्षण – रांची केंद्र

15 नोव्हेंबर 2008 रोजी लालपूर येथील एका गृहनिर्माण संस्थेत सुमारे 30 पालकांसाठी मुल्याधारित शिक्षणासंबंधीचे सत्र आयोजित करण्यात आले होते. या कार्यक्रमाचा मुख्य ऊद्देश्य पालकांना मिशनच्या मुल्याधारित शिक्षणपद्धतीच्या अभ्यासक्रमाची माहिती देणे व त्यांच्या पाल्यांमध्ये योग्य ती मुल्ये रुजविण्याविषयी त्यांच्यामध्ये जागरुकता निर्माण करणे हा होता.

सुनंदा चौहान, अनिता तिवारी, अनुराधा चौहान या भगिनींनी तर अरुणकुमार लाल, पवन सहाय, मनोज तिवारी या बंधूंनी आपापल्या भाषणांतून उपस्थितांना विषयाची ओळख करुन दिली. या कार्यक्रमाचे विशेष म्हणजे अनेक प्रयोगांद्वारे मुल्यांचे प्रशिक्षण हे होते. श्रोत्यांमध्ये 3 शिक्षक देखील होते. त्यांनी आपापल्या शाळांना या कार्यशाळेच्या ऊपयुक्ततेची माहिती दिली. या कार्यक्रमाच्या परिणामस्वरुप इतर अनेक शाळांच्या सहभागाची अपेक्षा रांची केंद्र करीत आहे.



श्री रामचंद्र मिशन
एकोज इंडिया
जानेवारी 2009 केवळ खाजगी वितरणाकरिता खंड 2 अंक 1


## देवरीया आश्रमाचे उद्‌घाटन



देवरिया (ऊ.प्र.) येथे आश्रमाची उभारणी करण्यात आली. येथील स्थानिक अभ्यासींनी शारिरीक व आर्थिक भार उचलून या आश्रमाचे काम पूर्ण केले आहे.

आधी ठरल्याप्रमाणे बंधू यु. एस. बाजपेई यांचे विभागप्रमुख बंधू नरसिंग वर्मा, गोरखपूर येथील प्रशिक्षक, बंधू ए.के.सिंग, बंधू डि.डि.पांडे, बंधू रमाशंकर दिक्षित व बंधू विनोद मोहन पांडे यांचे समवेत आगमन झाले. त्यांनी ध्यानगृहाचे ऊद्‌घाटन केले.

या समारोहासाठी देवरिया, सहोदर पट्टी, लक्ष्मीगंज, कप्तानगंज, पडराऊना, कासया (कुशीनगर), नदवर घाट, खुखुंद, जमीरा, सिसवा, गोरखपूर आदी केंद्रांमधून जवळपास 200 अभ्यासी उपस्थित होते.

यावेळी एक अध्यात्मिक संमेलनाचे आयोजन करण्यात आले होते ज्यामध्ये शहर व गावांतील सन्माननीय नागरीक, डॉक्टर्स, इंजिनीयर्स, पत्रकार, व्यापारी आदी उपस्थित होते. सर्वप्रथम बंधू रमाशंकर दिक्षित यांनी आश्रमाची संरचना समजावून सांगीतली. बंधू वर्मा यांनी रामचंद्र मिशन संस्था, गुरुदेव व मिशनच्या उद्दिष्टांविषयी माहिती दिली. बंधू बाजपेयींनी "अध्यात्मिकता का? व त्याची गरज का आहे?" आणि "मनाचे नियमन व मनावर ताबा" यावर अतिशय सोप्या व आकर्षक पद्धतीने स्पष्टीकरण दिले.

## चंद्रपूर – महाराष्ट्र येथील आश्रमाच्या जमीनीचे नोंदणीकरण

चंद्रपूर केंद्राचे अभ्यासी बंधू अमरसिंह राठोड व भगिनी सुस्मीता राठोड यांनी आश्रमाकरिता 4 एकर जमीन उपलब्ध करुन दिली. या जमीनीची नोंदणी मिशनचे संयुक्त सचिव बंधू ए. पी. दुराई यांनी विभागीय प्रमुख बंधू सुभाष वैद्य व केंद्र प्रमुख बंधू एल. के गोयल यांच्या उपस्थितीत केली.

आश्रमासाठी अधीग्रहीत केलेल्या या जमीनीवर सत्संगाचे आयोजन करण्यात आले. बंधू. ए. पी. दुराई यांनी सर्व अभ्यासींशी संवाद साधला व या मिळालेल्या भेटीची प्रशंसा केली. पू. गुरुदेवांविषयीचा आदरभाव त्यांच्या बोलण्यातन जाणवत होता. त्यांनी दानशर अभ्यासींनी दाखविलेल्या प्रेमाचे व त्यांच्या औदार्याचे स्वागत केले. त्यांनी बंधूभाव वाढविण्याचे व स्वयंस्फूर्तीने मिशनच्या कामात झोकून देण्याचे आवाहन केले.

आदल्या दिवशी आय. एन. सी. एम. बी. ए. कॉलेज येथे विद्यार्थी आणि इतर नागरिकांसाठी खुल्या चर्चासत्राचे (ओपन हाऊस) आयोजन करण्यात आले होते. जवळ जवळ 150 जणांनी या कार्यक्रमास हजेरी लावली. बंधू. ए. पी. दुराई यांनी अध्यात्मिकतेमध्ये योग्य व सजीव गुरुदेवांचे महत्व विषद करुन सांगितले. बंधू वैद्य यांनी सहजमार्ग साधना पद्धत हिंदीमध्ये समजावून सांगीतली.





## ऊत्तराखंड येथील उत्कंठावर्धक अनुभव



गंगोलीहाट, अल्मोडा व रानीखेत येथील एक प्रशिक्षक व तीन अभ्यासींनी ऊत्तराखंडमध्ये वेगवेगळ्या ठिकाणांचा दौरा केला. यामागील हेतु, ठिकठिकाणी ओपन हाऊस आयोजित करणे, ज्या अभ्यासींची ब–याच काळापासुन प्रशिक्षकांची भेट होऊ शकली नाही अश्या अभ्यासींना सिटींग देणे जेणेकरुन एखादे नवीन केंद्र विकसीत होऊ शकेल, हा होता.

आम्ही 13 डिसेंबरला अल्मोडा येथून सुरुवात केली व आमचा प्रथम मुक्काम होता गंगोलीहाट. एक असे नवीन केंद्र जेथे सुमारे 15 अभ्यासी आहेत. येथील अभ्यासींच्या मित्र व कुटूंबियांसाठी दि. 14 रोजी ओपन हाऊसचे आयोजन केले गेले ज्यामध्ये सुमारे 40 जणांनी भाग घेतला. दुस–या दिवशी आम्हांस एका यशस्वी अशा गैरसरकारी संघटनेकडून (जाग रे पहाड) त्यांच्या कर्मचारी वर्गासाठी व्याख्यान देण्याचे आमंत्रण मिळाले. या संस्थेतर्फे आम्हांस त्यांच्या कामगार, पर्यवेक्षक आणि गावक–यांसाठी दरमहा अध्यात्मिकतेवर व्याख्यान आयोजित करण्याचे आमंत्रण मिळाले.

दि. 15 ला आम्ही पिथोरागढ व आसपासच्या अभ्यासींना भेटलो. चांडक जवळ आमची एका भगिनी बरोबर भेट झाली. त्यांच्यावर नुकतीच ब्रेन ट्यूमरची शस्त्रक्रिया करण्यात आली होती. स्वत:च्या घरी सिटींग मिळाल्यामुळे त्यांना खूपच आनंद झाला. आम्ही काही वेळासाठी थळ येथे थांबलो व एका अश्या अभ्यासी भगिनीला भेटलो ज्यांनी सुमारे दोन वर्षापासून साधना करणे थांबविले होते. सिटींग घेतल्यानंतर त्यांनी ध्यान पून्हा सुरु करण्याची तयारी दाखविली.

चौकोरी येथे रात्रभर मुक्काम केल्यावर आम्ही विजयपूर येथे थांबलो व तेथील विजयपूर इंटरमिजीएट कॉलेजच्या कर्मचा–यांना भेटलो. त्यांना आम्ही सहजमार्ग साधनापद्धती व मुल्याधारित अध्यात्मिक शिक्षण या विषयी माहिती दिली.

जेव्हा आम्ही गरुरा येथे पोहोचलो तेथे आम्हास काही परिचीत भेटले त्यापैकी 3 जणांनी त्याच रात्री प्रथम सिटींग घेण्याची तयारी दर्शविली. दुसरे दिवशी आम्हांस काही भुतपूर्व अभ्यासी भेटले तसेच काही नवीन अभ्यासीपणं झाले. आम्ही आमच्या बरोबर मिशनची नवीन प्रकाशने, ऑडीयो, व्हिडीयो, फोटोग्राफ व मिशनची पूस्तके देखील नेली होती, जी नवीन अभ्यासींद्वारे लगेचचं विकत घेतली गेली.

पू. गुरुदेवांच्या आशिर्वादाने गरुर या नवीन केंद्रावर रविवार दि. 21 डिसेंबर रोजी सात स्थानीय अभ्यासी ध्यानासाठी आले होते. अल्मोडा व रानीखेत येथील प्रशिक्षक या केंद्रास सहाय्य करित आहेत.

## श्री रामचंद्र मिशन, सिक्कीमची नवी वाटचाल

सरकारी अधिका–यांसाठी, 'ध्यानाद्वारे तणावाचे नियोजन' या कार्यक्रमाचे आयोजन, गंगटोक, सिक्कीम येथे 6 ते 8 नोव्हेंबर 2008 या कालावधीत एस एम आर टी आय (स्मृति) तर्फे करण्यात आले. हा कार्यक्रम सिक्कीम सरकारतर्फे प्रायोजित केला गेला. समन्वय साधला होता बंधू रविंद्र तेलंग–आय ए एस सचीव, शेतकी व फुल उत्पादन विभाग यांनी, ते मिशनचे प्रशिक्षकही आहेत.

कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे होते, शेतकी व फुल उत्पादन विभागाचे मंत्री श्री. सोमनाथ पौडयाल आणि उदघाटन प्रसंगी माननीय अतिथी होते, आमदार श्री. भीम ढुंगेल. श्री. ढुंगेल यांनी सिक्कीमी समाजाच्या वर्तमान स्थिती बद्दल तीव्र चिंता व्यक्त केली आणि राज्यातील आत्महत्यांचे प्रमाण फारच जास्त असल्याबद्दल त्यांना अतिशय दुःख होत होते. समाजाला आत्यंतिक गरज असताना अशा कार्यक्रमाचे आयोजन होत असल्याबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केले.

डॉ. परिप्लावी यांनी 'तणाव– एक वैधकीय दृष्टिकोन' या विषयाचे सादरीकरण केले. डॉ. अरुण दवे यांनी तणाव मुक्तीच्या काही तंत्रांचे प्रात्यक्षिक दाखविले. त्यानंतरच्या सत्रात 'संतुलित अस्तित्व' या विषयावर डो. ग्यान सरीन यांचे भाषण झाले. नंतर बंधू तेलंग यांनी सहजमार्ग पद्धतीतील ध्यानाविषयी थोडक्यात माहिती दिली व तेथील 34 जणांनी साधना सुरु करण्याची इच्छा दर्शविली.

दुस–या दिवशीच्या कार्यक्रमात, भगिनी सिता यांनी 'वैश्विक मूल्ये' या विषयावर आयोजीत केलेले चर्चासत्र, 'मनाचे नियमन' या विषयावरील बंधू सरीन यांचे व्याख्यान आणि डॉ. दवे यांचे 'मानवाचे परिवर्तन' या विषयावर व्याख्यान झाले. या सत्राचा शेवट 'सद्‌गुरुंचा हस्तस्पर्श' या चित्रफितीने करण्यात आला. सारेच श्रोते ही चित्रफित बघून भारावून गेले होते.

शेवटच्या सत्राची सुरुवात 'वेळेचे नियोजन' या विषयावरील बंधू दवे यांच्या सादरीकरणाने व 'सकारात्मक विचार' या विषयावरील भगिनी सिता यांच्या व्याख्यानाने झाली. प्रतिक्रियांच्या सत्रामध्ये सहभागींनी ताज्या हवेत श्वास घेतल्यावर वाटते तसे वाटले, सुखावह वाटले अशा भावना व्यक्त केल्या. कार्यक्रमाचा त्यांच्यावर फारच प्रभाव पडला व त्यामुळे त्यांच्यात बरेच बदल घडून येतील. काहींनी सिटींग नंतर फारच हलके वाटल्याचे सांगितले.

## आंतरिक परिवर्तन – माझ्यापासून त्यांच्यापर्यंत

तिप्तुर – 13 व 14 डिसेंबर 2008

गुरुदेवांनी वेळोवेळी जोर देऊन सांगितले आहे की, सहजमार्ग हा स्व–परिवर्तनातून मानवीय परीपूर्णतेचे किंवा दिव्यत्विकरणाचे उद्दीष्ट साध्य करण्याचा मार्ग आहे. यासाठी वापरली जाणारी उपकरणे आहेत आपल्या साधनेतील विविध अंगे – ध्यान, सफाई वगैरे. म्हणून तिप्तुरच्या नवीन आश्रमामध्ये दोन दिवसांचा एक प्रशिक्षण वर्ग घेण्यात आला.

तिप्तुर, हसन, तुमकुर, शिमोगा आणि भद्रावती येथून जवळपास 130 अभ्यासींनी यात भाग घेतला. पहिल्या दिवसाची सुरुवात सत्संगाने झाली. त्यानंतर धर्म व अध्यात्मिकता आणि सद्‌गुरुंची भूमिका व महत्व या विषयावर अनुक्रमे बंधू बी. जी. सुब्रमण्या व बंधू श्रीनिवासा यांची भाषणे झाली. या भाषणांमुळे आम्ही स्वतःला खरोखरीच प्रश्न विचारले: आम्ही सर्व कोणत्या उद्दीष्टासाठी येथे आलो आहोत? या सर्वांमध्ये आमच्या सद्‌गुरुंची भूमिका काय आहे? आणि त्याहीपेक्षा महत्वाचे म्हणजे या सर्वांमध्ये आमची भूमिका काय असली पाहिजे? फक्त साधना करण्याची इच्छा इतकेच पुरेसे आहे का?

भगिनी मंजुळा यांनी 'चारित्र्याची घडण' या विषयावर दिलेले व्याख्यान आमच्या बाजूने काय केले जायला हवे याबाबतीत डोळे उघडणारे होते. त्याने आम्हाला प्रेरणा दिली व या गोष्टीवर मननं करण्यास भाग पाडले की आम्ही जे असायला हवे ते बनण्यासाठी काय करण्याची गरज आहे.

दुसरा दिवस सहजमार्ग साधनापद्‌धतीला वाहिलेला होता. ध्यान, सफाई व प्रार्थनेचे विविध पैलू विस्ताराने समजावून सांगण्यात आले आणि अभ्यासींकडून विचारल्या गेलेल्या ब–याच प्रश्नांची उत्तरे दिली गेली. अंतिम सत्र हे ' मी व माझे गुरुदेव' या विषयावरील परस्परसंवादाचे होते. यात ब–याच अभ्यासींनी त्यांचे गुरुदेवांविषयीचे अनुभव कथन केले. त्यातील बरेच अनुभव हेलावून टाकणारे व अजून गुरुदेवांना भेटू न शकलेल्या नवीन अभ्यासींसाठी प्रेरणादायी होते. संध्याकाळच्या सत्संगाने कार्यक्रमाची सांगता झाली. या दोन दिवसात जे काही शिकलो त्यावर मननं करण्याचा व आपल्या जीवनात ते लागू करण्याचा दृढनिश्चय करुन आम्ही आपापल्या शहरांकडे परत निघालो.





## महाराष्ट्र गोवा प्रशिक्षक चर्चासत्र

पुण्यातील पानशेत येथील रिट्रीट सेंटरमध्ये 14 ते 16 नोव्हेंबर 2008 च्या दरम्यान महाराष्ट्र विभागासाठी प्रशिक्षकांचे एक चर्चासत्र आयोजित केले गेले.

40 प्रशिक्षक बंधू भगिनींनी या चर्चासत्रात भाग घेतला. 15 नोव्हेंबर रोजी विभागीय प्रमुख बंधू सुभाष वैद्य यांनी चर्चासत्राचे उद्‌घाटन केले. सकाळचे सत्र दोन विषयांना वाहिलेले होते. गुरुवंदना म्हणजे आपल्या तीन गुरुंसाठी करावयाचे कार्य आणि सहजमार्ग साधनापद्धतीवरील सादरीकरण. दुपारचे सत्र तीन भागात विभागलेले होते – इच्छुकांना सहजमार्गाची ओळख करुन देणे, मिशनच्या कार्यातील प्रशिक्षकांची भूमिका आणि प्रशिक्षकाचे कार्य – अभ्यासी सिटींग.

16 नोव्हेंबरच्या सकाळच्या सत्राचे विषय होते – प्रशिक्षक अभ्यासी परस्परसंवाद, वर्तणुकीबद्दल मार्गदर्शन, व्यवस्थापकीय कार्य आणि मिशनच्या जमा खर्चाच्या हिशोबाचे व्यवस्थापन.

ब–याच प्रशिक्षकांनी असे मत व्यक्त केले की, या चर्चासत्रामुळे त्यांना अध्यात्मिक तसेच मिशनच्या व्यवस्थापकीय क्षेत्रातील प्रशिक्षकाच्या भूमिकेविषयी जाणून घेण्यास फारच मदत झाली. एक सर्वसाधारण निरीक्षण असे होते की नव्यानेच प्रशिक्षक झालेल्यांच्या मनात काम करतांना ज्या काही शंका निर्माण झाल्या होत्या, त्यांचे संपूर्ण निराकरण अश्या पद्धतीने झाले, की जणूकाही त्यांनी ते प्रश्न आधीच विचारून ठेवले होते. यातून गुरुदेवांची त्यांच्या कार्यकर्त्यांबद्दलची प्रेममय काळजी दिसून येते. त्यांना आपल्या प्रामाणिक कार्याचा आनंद देण्यासाठी आपण सारे कसोशिने प्रयत्न करुया.

## शैक्षणिक संस्थांवर धाड – जोधपूर राजस्थान.






जोधपूर केंद्रातर्फे 6 ते 9 नोव्हेंबर दरम्यान विविध शिक्षणसंस्थांमध्ये सहजमार्गाबद्दल व्याख्यानांची एक मालिका आयोजित केली होती. स्थळांची नावे अशी होती – लालबहादूर शास्त्री तंत्रविद्न्यान व संशोधन केंद्र, मारवार तंत्रविद्न्यान विद्यालय आणि संशोधन केंद्र (विषय होता – विद्न्यान व अध्यात्मिकता. जवळपास 150 विद्यार्थी व शिक्षकांनी भाग घेतला.) टाऊन हॉल (विषय, "अध्यात्मिकता – उद्देशपूर्ण जीवनाचा मार्ग", उपस्थिती 600), जयनारायण व्यास विश्वविद्यालय विस्तारित व्याख्यान कक्ष (विषय, "योग आणि सहजमार्ग", सहभाग 150 शिक्षक व कर्मचारी) आणि राष्ट्रिय कायदा विश्वविद्यालय (विषय, कायदा आणि अध्यात्मिकता, सहभाग 150 विद्यार्थी व शिक्षकवर्ग).

डॉ. के. एस. बालसुब्रमण्यम, संचालक, सहजमार्ग संशोधन संस्थान, चेन्नई यांनी आपल्या भाषणात सांगितले की, अध्यात्मिकता कोणत्याही नावाचा धावा करत नाही, कोणतेही गुणधर्म चिकटवत नाही, मानवी मनाने निर्माण केलेल्या कोणत्याही कृत्रिम देवदेवतांच्या खुषामतीची मागणी करत नाही, तर मानवाचे लक्ष त्या अनंताकडे, सर्व सजीवांच्या त्या स्त्रोताकडे वेधून घेते जो नाम, आकार व गुणरहीत आहे. परमतत्वाकडे जाणारा असा मार्ग सर्वांना एकात्मतेत बांधणारी मोठी शक्ती बनु शकतो. आणि सर्व मानवप्राण्यांना मग तो कोणत्याही देशाचा वा धर्माचा असो एका सुत्रात एकत्र आणू शकतो, जो मानवी जीवनाचा अगदी मूलभूत पैलू आहे आणि दुर्दैवाने आज सर्वत्र ज्याचा अभाव आढळतो. परमतत्वाकडे नेणारा एक मार्ग अशा विनम्र भावनेने अध्यात्मिक साधना जर मोठ्या प्रमाणावर अंगिकारली गेली तर कदाचित ती एकात्मता साधणारी फार मोठी शक्ती ठरु शकेल. जवळपास 10–12 बंधूभगिनींनी साधनेचा अंगिकार केला आहे आणि प्रक्रिया अजुनही चालू आहे.

## भेटीगाठींचा कार्यक्रम – गुजरात.

ब–याच छोट्या केंद्रांमधून अभ्यासींशी परस्परसंवादासाठी नवीन लोकांची गरज असल्याचे आढळून येत होते. चर्चेनंतर असे जाणवले की आपण भेटीगाठींचे कार्यक्रम आयोजित केले पाहिजेत ज्यामध्ये एका केंद्रातील अभ्यासी दुस–या केंद्रात जातील व किमान अर्धा दिवस एकत्र व्यतीत करतील. यजमान केंद्रांमध्ये कळकळ व उत्साह निर्माण करण्याचे हे एक प्रभावी माध्यम आहे असे आढळून आले. आळीपाळीने दोन तीन महीन्यांच्या अंतराने दुस–या केंद्राचे अभ्यासी पहिल्या केंद्राला भेट देतील.

यातून कल्पना व संकल्पनांचे आदान प्रदान होते व अभ्यासींनी इतरांचे दृष्टिकोन समजावून घेतल्यामुळे सुस्पष्टता येते. दोन्ही केंद्रातील चांगल्या गोष्टींचे आदान प्रदान होते. अभ्यासी एकत्रपणे जवळच्या केंद्रापर्यंत प्रवास करतात त्यामूळे बंधूभाव वाढण्यास मदत होते.

अशाच प्रकारचा एक मेळावा वापी पासून 25 कि.मी. अंतरावर असणा–या दमण या केंद्रात संपन्न झाला ज्यात सिल्वासा (अंकित केंद्र) व वापी या केंद्रांमधील अभ्यासी दिवसभराच्या कार्यक्रमासाठी एकत्र आले होते. ही केंद्रे गुजरातच्या दक्षिणेला सुरत व मुंबई या शहरांच्यामध्ये स्थित आहेत. यावेळी असे दिसून आले की, असे भेटीगाठींचे कार्यक्रम आयोजित करण्यात आलेल्या सर्व केंद्रांमध्ये वागणूकीतला गोडवा नक्कीच जास्त आहे जो केंद्राच्या विकासासाठी अत्यंत उपयुक्त आहे.

## अभ्यासवर्ग – बालीया केंद्र



स्मृतीने (एस.एम.आर.टी.आय.) उपलब्ध करुन दिलेल्या अभ्यास वर्गासाठीच्या साधनांचा उपयोग करुन घेण्याची कल्पना आमच्या केंद्रात प्रत्येक रविवारच्या सत्संगानंतर एक तास राबविण्यात आली. आम्ही 4 ते 5 समूह बनविले. दिल्या गेलेल्या साहित्याचा आठवड्याभरासाठी अभ्यास केल्यानंतर प्रत्येक समुहाच्यावतीने बोलण्यासाठी एक प्रतिनिधी नेमला गेला. आपल्या शिकवणुकीला अनुसरुन अध्यात्मिक व भौतिक समज वाढविण्याच्या दृष्टिने या साहित्याची आखणी अतिशय पद्धतशिरपणे केली गेली आहे. हा वर्ग 2008 मध्ये सुरु झाला आणि यात सहभागी झालेल्या तरुणांमध्ये या कार्यक्रमाद्वारे झालेला प्रचंड फरक आम्हाला दिसुन आला. संपूर्ण आठवडाभर ते पुस्तके शोधण्यात, रवीवारच्या सत्राची तयारी करण्यात गुंतलेले असतात.

सुरुवातीला थोडासा संकोच होता परंतु दोन आठवड्यानंतर त्यांना वाटू लागले की ते बोलत नाहीत तर त्यांच्यामार्फत गुरुदेवच बोलत आहेत. आणि एरवी वाया जाणारा वेळ सत्कारणी लावण्याची गुरुदेवांनी दिलेली ही एक संधी आहे. हे बदल पाहून प्रत्येक अभ्यासी आश्चर्यचकित झाला आहे व त्यामुळे त्याचा गुरुदेवांवरील विश्वास व प्रेम आणखिनच वाढीस लागले आहे.

एक आठवड्यानंतर असे लक्षात आले की, ज्यांना वेळ नाही असे अभ्यासी कृपया जाऊ शकतात असे जाहीर करुन सुद्धा, सत्संगासाठी आलेले सर्व अभ्यासी कार्यक्रमात सहभागी झालेल्यांचा त्या विषयावरील दृष्टिकोन जाणून घेण्यासाठी थांबतात.

आम्ही गुरुदेवांच्या चरणी प्रार्थना करतो की त्यांनी आम्हाला समजुतदारपणा, सहनशिलता, प्रेम आणि क्षमाशिलता या गुणांचे वरदान द्यावे आणि त्यांचा स्विकार करण्याची शक्ती प्रदान करावी.

## एन. एस. आय. सी. नवी दिल्ली येथील खुले चर्चासत्र

राष्ट्रिय लघुउद्योग महामंडळ (भारत सरकारचा उपक्रम) यांचे कार्यालय, ओखला, नवी दिल्ली येथे, दि. 4 डिसेंबर रोजी, एक खुले चर्चासत्र आयोजित करण्यात आले. यामध्ये 45 जणांनी सहभाग नोंदविला, ज्यात काही उच्चपदस्थ अधिकारीही होते. विषय होता, 'संतुलित अस्तित्वासाठी ध्यान'. बंधु जी. व्ही. पलटा यांनी थोडक्यात माहिती सांगितली व वक्त्यांचा परिचय करुन दिला. बंधू ग्यान सरिन यांनी निवडलेल्या विषयावर हिंदीतून भाषण केले. भगिनी शोभना यांनी विषयाला ओझरता स्पर्श करीत, पद्धतीबद्दलची माहिती सांगितली. यानंतर प्रश्नोत्तराचे सत्र घेण्यात आले.



# श्री रामचंद्र मिशन
# एकोज इंडिया

जानेवारी 2009 केवळ खाजगी वितरणाकरिता खंड 2 अंक 1


## योगाश्रम तिरुपती

हे लक्षात घेणे वैशिष्ठ्यपूर्ण ठरेल की तिरुपती केंद्रात मिशनचा पहिला आश्रम बांधला गेला. मूळ जमीन अडीच एकर होती व तो 1965 साली अस्तित्वात आला. याची पायाभरणी पू. बाबूजींच्या हस्ते झाली होती व त्यानंतर सातत्याने या केंद्राचा विकास होत आहे. आश्रम हा अशा सुंदर ठिकाणी वसलेला आहे ज्याच्या पार्श्वभूमीवर तिरुमलैचे डोंगर व कपिलतीर्थचा धबधबा आहे.

या केंद्राचे पहिले प्रशिक्षक डॉ. के. सी. वरदाचारी यांच्या मार्गदर्शनाखाली येथील अभ्यासींना सर्वोत्तम असे प्रशिक्षण मिळाले. पूज्य बाबूजी महाराज हे केंद्र सुरु झाल्यापासून आपल्या दक्षिण भेटीला जोडून प्रत्येक वर्षी नियमीतपणे या केंद्राला भेट देत असत. 1990 साली या केंद्राचा रौप्यमहोत्सव साजरा केला गेला. यावेळी पू. गुरुदेवांनी या केंद्राला भेट देऊन सर्व अभ्यासींना आशिर्वाद दिले.

या केंद्राची सुरुवात 1965 साली डॉ. सी. राजेश्वर यांनी भेट म्हणून दिलेल्या छोट्याशा इमारतीत झाली आणि त्याची सातत्याने वाढ होत आहे. नवीन ध्यानगृहाचे उद्घाटन गुरुदेवांच्या हस्ते 1994 साली करण्यात आले ज्यात जवळपास हजार अभ्यासी बसू शकतात.

सहजमार्ग संशोधन केंद्राची स्थापना डिसेंबर 1984 मध्ये प्रथम तिरुपती येथे केली आहे. सध्या या केंद्रात जवळपास 900 अभ्यासी आहेत. बरेच उपक्रम येथे नियमीतपणे राबविले जातात.

आश्रमात अतिशय सुसज्ज असे वाचनालय आहे जे प्रत्येक दिवशी खुले ठेवले जाते. बरेच अभ्यासी मिशनचे साहित्य वाचण्यासाठी याचा उपयोग करतात. मुलांसाठी बैठे व मैदानी खेळ खेळण्याच्या सुविधा उपलब्ध आहेत. रविवारी स्वागत कक्ष सुरु ठेवले जाते जिथे नवीन येणा–या इच्छुकांना मिशन व पद्धतीबद्दलची थोडक्यात माहिती सांगितली जाते.

या केंद्राचे अभ्यासी आश्रमाच्या अनेक सेवांमध्ये सक्रियपणे ऐच्छिक योगदान देत असतात.



ध्यानकक्ष



वाचनालय



आश्रमातील रस्तो

संग्रहातून





पहिली इमारत



मुलांसाठी जागा

**To subscribe to this Newsletter please visit http://www.srcm.org/centers/as/in/newsletter/index.jsp**
**For feedback, suggestions and news articles please send email to in.newsletter@srcm.org**


© 2008 Shri Ram Chandra Mission ("SRCM"). All rights reserved.
"Shri Ram Chandra Mission", "Sahaj Marg", "SRCM", "Constant Remembrance" and the Mission's Emblem are registered Trademarks of Shri Ram Chandra Mission.